# 'कृषी' भारतीय अर्थव्यवस्थेचा 'कणा' — काल, आज आणि उद्या

**डॉ. आस्तीक टी. मुंगमोडे**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
ज्ञानेश महाविद्यालय, नवरगाव, जि. चंद्रपूर
asteekmungmode@gmail.com

भारतातील कृषी हा केवळ व्यवसाय नाही तर तो भारतीयांचा जीवन जगण्याचा मार्ग आहे. कृषी हा भारतीय संस्कृतीचा एक भाग आहे. कृषी हा भारतीय अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ आहे. कृषी व उद्योग हे एकमेकांना पर्यायी नसून पूरक आहे. कृषी उत्पादित कच्च्या मालाच्या आधारे उद्योगपतींचा तीव्र गतीने विकास झालेला दिसून येतो. परंतु शेतकरी व शेतीचा विकास झालेला नाही. नवीन आर्थिक धोरण व जागतिक व्यापार संगठनेच्या स्वीकारामुळे जास्तीत जास्त जनतेचा विकास होणे अपेक्षित होते. परंतु दिवसेंदिवस अन्य क्षेत्र विकसित होऊन कृषी व कृषकांविषयी असलेली आस्था कमी—कमी होत आहे. भारतात कृषी क्षेत्राच्या विकासाशिवाय विकासाची कल्पनाच करता येत नाही. संपूर्ण देशाचे पोषण करण्याचे सामर्थ्य ठेवणारा शेतकरी नव्या आर्थिक धोरणानंतर स्वत: दीन होऊन आत्महत्या करू लागला आहे. वर्तमानकाळात भारतात कृषी क्षेत्रात काहीतरी भयंकर चूक होत आहे. जोपर्यंत कृषी क्षेत्रातील चूक सुधारल्या जात नाही तोपर्यंत भारताला महासत्ता होण्याचे स्वप्न पूर्णत्वास आणता येणार नाही. कृषी व कृषकांच्या समस्यांत असलेला मूलभूत अंतर अजूनही पूर्णत: भारतीयांना समजलेला नाही. कृषीच्या समस्या या नैसर्गिक शास्त्रासी संबंधित असून कृषकाच्या समस्या या समाजिक शास्त्रासी संबंधित आहेत. कोविड १९ मध्ये जगातील सर्व उद्योग क्षेत्रामध्ये मंदीसदृश्य परिस्थिती असतांना कृषी क्षेत्र भरभरटीला येतांना निदर्शनात आले. हीच बाब उद्योजकांनी हेरली. यामुळेच खाजगी उद्योजक कृषी क्षेत्रावर आपले प्रभुत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करू लागले आहेत. भारतातील नवीन कृषी कायदा या उद्योजकांच्या सोयींसाठी नियोजित रचलेला कट तर नाही ना! असी शंका निर्माण करतो.

भारतात स्वातंत्र्योत्तर कालखंडात कृषी विकासाचे स्वातंत्रलढ्याच्या काळात आखण्यात आलेल्या सुधारणा व शेतकऱ्यांचे संघटन, १९६० ते १९७० च्या दशकातील हरितक्रांती व १९९० नंतरचे शिथिलीकरण असे तीन टप्पे पाडले जातात. स्वातंत्र्यानंतरच्या काळात सरकारने मध्यस्थांचे उच्चाटन, महसूल कपात, सिंचन, अधिकोषांचे राष्ट्रीयीकरण, सहकारी संस्थांचे संघटन, अग्रणी बॅक योजना, क्षेत्रीय ग्रामीण बॅक व नाबार्डची निर्मिती केली. ही धोरणे स्वातंत्र्यानंतरच्या आयात पर्यायी धोरणांना व औद्योगिक विकासाला पूरक ठरली. शेतीच्या उत्पादनात वाढ झाल्याने अन्नधान्याचे परकीय देशावरचे अवलंबित्व कमी झाले. त्यामुळे परकीय चलन उत्पादक क्षेत्रात गुंतविणे शक्य झाले. शेतीच्या उत्पादकतेत वाढ झाली परंतु त्याचबरोबर उत्पादन खर्चही वाढला. शेतीच्या उत्पादनात वाढ झाल्याने शेतमालाच्या पुरवठ्यात वाढ होऊन किंमती तीव्र गतीने घसरल्यात. आदानांची प्रचंड मागणी झाल्याने त्यांच्या किंमतीत जोमाने वाढ झाली. उत्पन्नापेक्षा खर्चाचे प्रमाण वाढत गेले. शेती भांडवलप्रधान व्यवसाय बनला. भारतात पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच कृषीक्षेत्राचा विकास करण्याचा प्रयत्न केला असला तरी योग्य किंमतीच्या अभावामुळे शेतकरी अडचणीत सापडला.

भारताने १९९१ मध्ये खाउजा धोरण स्वीकारले. जागतिकीकरणात अर्थव्यवस्थेत राज्यांनी कमीत कमी हस्तक्षेप करावा, बाजारावर सर्व सोपवावे, बाजाराचे नियम अर्थव्यवस्थेत चालतील, सरकारने त्यात हस्तक्षेप करू नये, असे सिद्धांत जागतिकीकरणात मांडले गेले. त्यामुळेच शेती ही बाजाराच्या कलावर विकसित होऊ लागली आहे. शेती व्यवसायाचे भांडवलीकरण होऊ लागले. या नितीने कृषी व्यवसायाचा विकास होऊन सुबत्ता येईल असे वाटत होते. परंतु भारतातील शेतकरी आत्महत्या सतत वाढत आहे. या वाढण्याऱ्या आत्महत्यांमुळेच देशापुढे अनेक नवी आव्हाने व समस्या निर्माण होत आहेत. डॉ. स्वामीनाथन यांच्या मते, ''भारतीय कृषी व्यवस्थेत काहीतरी भयंकर चूक होत आहे, जर कृषी क्षेत्रात चूक होत असेल तर इतर कोणत्याही क्षेत्राचे भले होऊ शकत नाही''. जागतिकीकरणात देशांनी खुली अर्थव्यवस्था मान्य केली. परंतु प्रगत देशात केवळ १० टक्के लोकसंख्या ही कृषीवर अवलंबून असून भारतातील ७० टक्के लोकसंख्या ही कृषीवर आधारित आहे. भारतातील भूमीधारण क्षमतेनुसार अल्पभूधारकांची संख्या अधिक आहे. सब्सीडीचा अभाव, तांत्रिक मागासलेपणा असतांना खुल्या अर्थव्यवस्थेत भारतीय शेतकरी तग धरू शकणार नाही हे अनुभव यातून येऊ लागले आहे. जागतिकीणाने शासनाच्या किंमतीवरील नियंत्रणाबद्दल शेतकऱ्यांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष माहितीचा अभाव असल्याने छोट्या कृषकांचे उच्चाटन होत आहे. देशाला आपली क्षमता व सोय यानुसार निर्भिडपणे जगण्याचे स्वातंत्र्य असते ते तत्व नाकारले जात आहे. खुली स्पर्धा आणि भारतीय शेतकरी यात जागतिकीकरणाने स्पर्धा निर्माण केली आहे. खुल्या स्पर्धा खेरीज गुणवत्ता, उत्पादकता वाढत नाही आणि प्रगती होत नाही असे सिद्धांत जागतिकीकरणामुळे निर्माण झाले. परंतु स्पर्धा कोणी, कोणाशी व कोठे करावी याचे निष्कर्ष यात नाही.

कुटीर व लघु उद्योग हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा आधार आहेत. ग्रामीण क्षेत्राात अनेक कुटुंब विविध लघु व कुटीर उद्योगात कार्यरत असून आपली उपजीविका भागवितात. त्यांच्या उत्पन्नाचे ते प्रमुख साधन आहे. जागतिकीकरणाच्या धोरणामुळे भारतात विकसित देशात निर्माण झालेल्या उच्च दर्जेदार वस्तू कमी किमतीत भारतीय बाजारपेठेत उपलब्ध झाल्या आहेत. भारतातील लघु व कुटीर उद्योगातून निर्माण झालेल्या वस्तू व विकसित देशाच्या वस्तू यात स्पर्धा निर्माण होऊन भारतीय वस्तू बाजारात टिकाव धरू शकत नाही. त्यामुळे ग्रामीण क्षेत्राात बेरोजगारीचे प्रमाण सतत वाढत आहे. ग्रामीण क्षेत्राात श्रमिकांचे जीवनमान ढासळत आहे. भारतातील एकूण उत्पादनाच्या ४०टक्के उत्पादन लघु क्षेत्राातून होत असून एकूण रोजगाराच्या ५० टक्के रोजगार या क्षेत्रातून निर्माण होतो. भारतातील एकूण निर्यातीच्या ३३ टक्के निर्यात ही लघु व कुटीर उद्योगातून होतो. परंतु जागतिकीकरणाने लघु व कुटीर उद्योगाच्या अस्तित्वाला धोका निर्माण झालेला आहे.

विकसित देश व विकसनशील देश यात तुलना केली असता असे दिसून येते की, भूधारण क्षेत्र, यंत्र, रासायनिक खतांची उपलब्धता, सब्सिडी, राज्याचे कृषी विषयक धोरण, विपणन व्यवस्था ही विकसित देशात शेतकऱ्यांच्या अधिकाधिक हिताची आहेत. असे असतांना देशांना समान मानून जागतिकीकरणाने स्पर्धेचे आयोजन करणे अन्यायकारक वाटते. जागतिकीकरणानंतर भारतात कृषी पूरक असलेल्या वस्तूंचा व उद्योगांचा फारसा विकास झालेला नाही. उलट अमेरिकासारख्या विकसित देशांनी आपल्याला अनुकूल असलेल्या नितींचा उपयोग करून विकसनशील देशांवर आपले वर्चस्व निर्माण केले. विकसित देशांनी विकसनशील देशांचे बाल श्रमिक व सब्सिडीचे प्रमाण कमी केले परंतु स्वत: मात्र याचाच उपयोग करीत असल्याचे आढळतात. जागतिकीकरणानंतर भारताच्या वस्तू व सेवांच्या निर्यातीत किंचित वाढ झाली असली तरी अन्य विकसनशील देशांच्या तुलनेत अल्प आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या मते, '' आपल्या उत्पादन खर्चापेक्षा कमी किमतीला उत्पादीत माल विकून आपल्याला लागणाऱ्या इतर वस्तू त्यांच्या उत्पादीत किंमतीपेक्षा अधिक किंमतीने विकत घेऊन शेतकरी, व्यापारी व नोकरदारांना हजारो कोटीचे वर्षाला कर्ज देतात.'' भारतीय कृषीत जोखीम जास्त आहे. नफ्याच्या सिद्धांतानुसार ज्या क्षेत्रात जोखीम जास्त असतो त्यात नफा अधिक असतो. परंतु भारतीय कृषी हे मान्सूनचा जुगार आहे असे आजही मनावेच लागते. जर उत्पादन चांगले झाले तरीही उत्पादीत मालाला योग्य किंमत मिळेलच याची शाश्वती नसते. आदाना मधील मोठी गुंतवणूक, नापिकी, कर्जबाजारीपणा व हवामानातील अनिश्चितता यामुळे कर्जफेडीची क्षमता कमी होऊन कर्जाचे डोगर वाढत आहे. एम.एल. डार्लिंग यांच्या मते, ''भारतीय शेतकरी कर्जातच जन्मतो, कर्जातच जगतो आणि कर्जातच मरतो.'' शेतकऱ्यांच्या वाढत्या कर्जामुळे कर्ज देणाऱ्या संस्था, सावकार, खते, बियाणे व किटकनाशकांच्या व्यापाऱ्यांचाच अधिक लाभ झाला. सावकार अडते, व्यापारी, कमिशन एजंट यांच्या नितीमुळे शेतकरी अडचणीत सापडत आहे.

सरकारने उद्योगातून निर्माण होणाऱ्या वस्तूंची किंमत कारखानदारांना ठरविण्याचा अधिकार दिलेला आहे. परंतु शेतकऱ्यांना अजुनही स्वत:च्या शेतमालाची किंमत स्वत: ठरविता येत नसून ती बाजार स्थितीवरच अवलंबून राहावे लागत आहे. कोलुमेलाच्या मते, ''कृषी हीच सर्व प्राप्तीचे आधार आहे''. भारतात कृषीचे भवितव्य निसर्गाच्या लहरीपणवर तर शेतकऱ्यांचे भवितव्य राज्याच्या धोरणावर अवलंबून आहे.

अमेरिका, इंग्लंड, फ्रांस, जपान इत्यादी देशात फक्त ३ ते ५ टक्के लोक कृषीवर आधारित आहेत. परंतु शेती ही भारतीय अर्थव्यवस्थेचा मूलाधार असून राष्ट्रीय उत्पन्नातील शेतीचा वाटा, अवलंबित्व लोकसंख्या, औद्योगिकरण, आर्थिक विकास, सामाजिक विकास या दृष्टीने शेतीचे महत्व वाढत आहे. कोल आणि हुवर यांच्या मते,'' संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी कृषीचा विकास अगोदर व्हायला पाहिजे जर कोणतेही क्षेत्र अविकसित असल्याने दुसरे क्षेत्रांच्या विकासात बाधा निर्माण होत असेल तर ते अविकसित क्षेत्र कृषी होय''. ते इतर क्षेत्राच्या विकासाला बाधीत करतात. साखर उद्योग, वस्त्रोद्योग, तेलघाणे, डाल गिरण्या, राइस मिल, लघुउद्योग व ग्रामोद्योग, दुग्धव्यवसाय, पशुपालन यासारखे व्यवसाय शेतीवर अवलंबून आहेत. भारतात कृषीक्षेत्रात यांत्रिकीकरण, वित्तपुरवठा, वाहतूक, दळणवळण यांचा विकास झाला असला तरी राष्ट्रीय उत्पन्नातील कृषीचा वाटा कमी–कमी होऊन अनेक समस्या निर्माण होत आहेत. युरोपायीच्या मते, ''कृषी उत्पन्नातील वाढ ही आर्थिक विकासाची चाबी आहे. जर एखादे राष्ट्र ते प्राप्त करण्यात सर्वप्रथम असफल झाले, तर संपूर्ण विकास प्रक्रियेला बाधा निर्माण होईल''.

नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतर सहज व स्वस्त वस्तू उपलब्ध होऊन कृषीवरील खर्च कमी होणार, कृषीसंबंधी बी–बियाणे, रासायनिक खते, औषधी, व यंत्रसामुग्री कमीत–कमी किमतीला शेतकऱ्याना मिळतील असा अंदाज केल्या गेला. परंतु वास्तविकतेत कृषी उत्पादन खर्चात दुप्पट वाढ झाली आहे. भारतात कृषी व्यवसाय हा कधीच लाभाचा नव्हता जर कुटुंबातील सदस्यांच्या कामाचे वेतन उत्पादन खर्चात समाविष्ट केले तर कृषीचे प्राप्त उत्पन्न ऋणात्मक असते. प्रा. रोस्टोवच्या मते, ''कृषी औद्योगिक विकासाची आधारशिला आहे आणि कृषी उत्पादन हे औद्योगिकरणासाठी मूलभूत कार्यशील भांडवल आहे''. डी. बी. मुर्रेच्या मते, ''आर्थिक इतिहासावरून हे स्पष्ट झाले आहे की, बहुतेक औद्योगिक देशांच्या प्रारंभिक

अवस्थेत उद्योगांचा विकास शेतकऱ्यांच्या शक्तीवरच निर्भर राहत आहे''. कृषी उत्पादकतेत वाढ झाल्याने औद्यागिक क्षेत्राला कच्चा मालाचा पुरवठा वाढला. त्यांच्या उत्पादितांसाठी ोतीच्या स्वरूपात बाजारपेठ उपलब्ध झाली. अतिरिक्त शेतमालाचा औद्योगिक वापर ही विकासाची पूर्वावश्यकता आहे. जागतिकिकरणाने बाजाराच्या कक्षा व्यापक झाल्याने कृषी क्षेत्राला कमी दराने आदाने प्राप्त होऊन कृषी उत्पादनाला योग्य भाव मिळणार असे भाकीत होते. भारताने १९९१ नंतर जागतिकीकरण, उदारीकरण, खाजगीकरण, विदेशी प्रत्यक्ष गुंतवणूक, नवीन कृषी निती, जागतिक व्यापार संघटना असे आर्थिक बदल स्वीकारले. तरी पण भारतीय उपभोक्ते व शेतकऱ्यांना कमी किमतीत साधने व वस्तू उपलब्ध झाालेल्या नाहीत. भारतीय शेतकरी अल्पभूधारक, दारिद्री, निरक्षर व परंपरावादी वृत्तीचा असल्याने तो कृषीक्षेत्रात झालेल्या आधुनिक संशोधन व तंत्रज्ञानाचा लाभ घेऊ शकत नाही. सर जान सरल यांच्या मते, ''भारतीय शेतकऱ्यात कृषीविषयी आवड व आवश्यक गुणांची कमी नाही. त्यांना त्यांच्या कार्याची पूर्ण जाणीव आहे. परंतु त्यांच्या जुनी पद्धती व जुने यंत्रे यामुळे ते आपले उत्पादन वाढविण्यास असमर्थ आहेत''. भारतात कृषी क्षेत्राचा विकास दिवसेंदिवस कमी कमी होत आहे. १९८० च्या दशकात कृषी विकास दर ३.५ टक्के तर २०१९—२० मध्ये जवळपास २.५ टक्के असल्याचे आढळते.

१९९५ च्या कृषी करारानुसार विकसित देशांनी ६ वर्षामध्ये प्रतिवर्षी २० टक्के दराने अनुदान कमी करून हे अनुदान कृषी उत्पादन मूल्याच्या ५ टक्के पर्यंत आणण्याची मर्यादा घालविण्यात आली. तर विकसनशील देशांनी पुढील १० वर्षामध्ये ही कृषी अनुदाने प्रतिवर्षी १३.३ % दराने कमी करून एकूण कृषी उत्पादन मूल्याच्या १०% पर्यंत आणवे असे ठरविण्यात आले. शेतीविषयी कराराच्या अशा अटी असल्या तरी विकसित देशांनी या अटींची अमंलबजावणी केली नाही. उलट आपल्या शेतकऱ्यांना सब्सिडी देणे सुरूच ठेवले. यामुळे भारतासह २० विकनशील देशांनी एकत्रित येऊन देशांनी सब्सिडी मागे घ्याव्यात असे संयुक्त निवेदन दिले. परंतु त्याचा काहीच परिणाम झाला नाही. यातुनच भारतीय कृषी क्षेत्रात अनेक नव्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

भारतातील कृषी हे रोजगाार निर्मितीचे मुख्य स्त्रोत आहे. कुशल व अकुशल श्रमिकांना कृषी क्षेत्र सामावून घेत असते. भारतात ४०.२% कार्यकारी जनसंख्या असून एकूण कार्यकारी जनसंख्येच्या ३२% कृषक, २७% श्रमिक व ४१% अन्य श्रमिक आढळतात. नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केल्यानंतरही भारतातील कृषीवरील अवलंबित्व कमी झालेले नाही. परंतु कृषी क्षेत्र व धारण क्षेत्र कमी कमी होत आहे.

कृषी व कृषीला पूरक असलेल्या व्यवसायातून उत्पादित झालेल्या वस्तू भारताला मोठ्या प्रमाणात विदेशी मुद्रा प्राप्त करून देतात. १९६०—६१ मध्ये एकूण निर्यातीच्या ४४.२४ % वाटा कृषी क्षेत्राचा होता. वर्तमान काळात निर्यातीत कृषीचा वाटा १०% पेक्षा कमी झालेला आहे. यावरून कृषी क्षेत्र सतत अपयशी व दुर्लक्षित होत असल्याचे दिसून येते.

भारतीय नियोजनात शेती विकासाला प्राधान्य दिले असले, तरी त्याचे प्रमाण कमी कमी करण्यात आले आहे. आर्थिक विकासाचा मूळ आधार शेती आहे. मात्र नवीन धोरणावर पाश्चिमात्य विकास नितीचा प्रभाव असल्यामुळे श्रमप्रधान, ग्राम आधारित पर्यावरण रक्षक, विकेंद्रिकरण, मुक्त तंत्रज्ञान, एकात्मतेचा आग्रह, स्वावलंबन, ऊर्जेचा अल्प वापर, आतंरिक स्वनियमावर आधारित धोरणे, उपाय, सहकारी नियंत्रणे,

या देशी विकास नितीचा व देशातील आर्थिक, सामाजिक शक्यतेचा विसर पडत आहे. कृषी उत्पादनात वाढ होत असली तरी कृषीचा राष्ट्रीय उत्पनातील हिस्सा मात्र ५०% वरून १८% झाला आहे. परंतु ६८% जनता आजही कृषीवर अवलबूंन आहे.

भारतात पुरातन संस्कृतीपासून कृषीला महत्वपूर्ण स्थान आहे. कृषी व्यवसायाशी भारतीयांची संस्कृती जुळलेली आहे. भारतात पशुपालन, दुग्धउत्पादन, मेंढपालन, कुक्कुटपालन, बकरीपालन, साखर उद्योग, जुट उद्योग, कापड उद्योग अशा उद्योगांची उभारणी सुद्धा कृषी व्यवसायातून झालेली आढळते. महात्मा गांधीच्या शब्दात ‘‘ भारतीय शेती ही भारतीय लोकांच्या उपजीविकेचे प्रमुख साधन असल्यामुळे शेती हा भारताचा आत्मा आहे. हजारो वर्षापासून शेतीने भारतीय लोकांचे आचार विचार, दृष्टीकोन व संस्कृतीची घडण केली आहे.’’

भारतात कृषी व्यवसायात गुंतलेल्या समाजाचा फारसा विकास झालेला नाही. डॉ. एम.जी. बोकरे यांच्या मते, ‘‘ज्या समाजात व अर्थव्यवस्थेत अनुत्पादक समाज सेवा वर्गीयांना उत्पादक वर्गापेक्षा जास्त कौटूंबिक उत्पन्न मिळू शकते त्या देशात शेतीचा मूलभूत कायाकल्प होऊन धनधान्य, समृद्धी, कच्चा माल, दूध, मांस, अंडी याचे उत्पादन झपाट्याने वाढू शकत नाही. अनुत्पादक वर्गाला मिळणारे कौटुंबिक उत्पन्न म्हणजे राष्ट्रीय उत्पन्नाची वाढ होय, हा चुकीचा समज झाला आहे. त्यामुळेच भाववाढ, सट्टेखोरी, दिखाऊ खर्चिकपणा व लाचलुचपत वाढली आहे.

भारतात शेतमालाचे उत्पादन करण्यासाठी बियाणे, श्रमिक, रासायनिक खते, डिझेल, औषधी या मुख्य आदानांची आवश्यकता असते. दहा वर्षाच्या काळात या सर्व आदानांच्या किंमतीत झालेली वाढ ही शेतमालाच्या किंमतीत झालेल्या वाढीच्या तुलनेत अधिक आहे. त्यामुळे शेतकऱ्याचे उत्पादन खर्च सुद्धा भरून निघत नाही. भारतात डॉ स्वामीनाथन यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी आयोगाची स्थापना केली. आयोगाने भारतीय कृषीचे अध्ययन केले. त्यावरून भारत सरकारला कृषीसंबंधी शिफारसी सादर केल्या. परंतु भारत सरकारने अजूनही त्या लागू केल्या नाहीत. यावरून भारत सरकारचा कृषी विषयक दृष्टीकोन स्पष्ट होतो. जेव्हा टमाटरचा पुरवठा होतो तेव्हा २ रू ते ५रू किलो टमाटर असतात. परंतु त्याच टमाटर पासून प्रक्रिया उद्योगांतून विविध उपभोग्य वस्तू बनतात त्यांना मात्र वर्षभर छापील किंमत प्राप्त होते. म्हणजेच संपूर्ण नफा हा उद्योगपतींना प्राप्त होतो. तेव्हा शेतकऱ्यांना छापील किंमतीतील हिस्सेदारी मिळणे आवश्यक आहे. म्हणूनच सर्व धोरण ठरविण्यापेक्षा शेतमालाचे किमंत धोरण, व शेतमालाची विक्री यावर भर देणे गरजेचे आहे. यासाठी जोपर्यत शेतकऱ्याला प्रोत्साहन मिळणार नाही तोपर्यत त्यांच्या विकास साकारता येत नाही. “आर्थिक जीवन एखाद्या वृक्षासारखे आहे, ज्याची मुळे कृषी, खोड उद्योग व व्यापार फांद्या आणि पाने आहेत.”

स.ह. देशपांडे यांच्या अध्ययनावरून, ‘‘शेती विकास हा भारतापुढील महत्वाचा प्रश्न आहे. शेतीवर अवलंबून असणाऱ्या कोट्यवधी लोकांचे जीवनमान उंचावणे व भरतीय अर्थव्यवस्थेला स्थिर पाया मिळवून देणे ही दोन उद्दीष्टे समोर ठेवून शेती विकासाचे कार्यक्रम हाती घेतले पाहिजेत. याबाबत सरकारची जबाबदारी मोठी असली तरी जोपर्यंत शेतकरी वर्ग स्वत: जागृत होऊन नव्या दिशेने वाटचाल करणार नाही

तोपर्यंत शेती विकासाच्या कार्यक्रमात चैतन्य निर्माण होणार नाही. भारतातील समाजरचनेत सरकारला शेती व शेतकरी यांना उच्च स्थान मिळवून देण्यासाठी विशेष निती व योजना तयार करणे आवश्यक आहे''.

भारतात कृषीचे महत्व व स्थान हे मर्यादितपणे मांडणे कठिण आहे. या व्यवसायात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष अनेक व्यवसायिक, श्रमिक, उद्योजक व उत्पादक जुळलेले आहेत. रोजगार, पूरक व्यवसाय, संस्कृतीची जोपासना, अन्नधान्य पुरवठा, कच्चा माल, विदेशी चलन प्राप्त, कुशल व अकुशल श्रमिकांचे समायोजन करण्याचे महत्वपूर्ण कार्य आजही कृषी सांभाळत आहे. भारताला महासत्ता बनवाचे असेल तर कृषी क्षेत्राच्या महत्वाला मान्य करून त्यातील समस्या दूर करणे आवश्यक आहे. भारतात शासन दरबारी असलेले सत्ताधारी व विरोधकही स्वत:च्या वेतनात अनेक पटीने वाढ करण्याचा निर्णय मिनिटाच्या आत मंजूर करतात मात्र शेतकऱ्याच्या हितांशी संबध असलेला निर्णय घेण्यासाठी यांना आयोगाची आवश्यकता भासते. आयोगाने दिलेल्या शिफारसी लागू करण्यासाठी संसदेत गदारोळ घातला जातो हे लोकहितवादी समजल्या जाणाऱ्या लोकशाही शासन व्यवस्थेला कितपत शोभून दिसतो. याचे चिंतन भारतातल्या संवेदनहीन व स्वार्थकेन्द्री शासनव्यवस्थेला करणे आवश्यक आहे.

## संदर्भ :


१. डॉ. मिश्र जयप्रकाश, 'कृषी अर्थशास्त्र', साहित्य भवन पब्लिकेशन,आगरा,२००९,पेज न. १६—२०
२. गुप्ता पी.के.,'कृषी अर्थशास्त्र', वृंदा पब्लिकेशन, प्रा.लि. दिल्ली २००९, पेज न. २४६
३. देशपांडे स.ह.,'भारतीय शेती', समाज प्रबोधन संस्था, पुणे, १९६२, पेज न. ३,९०
४. बोकरे एम.जी., 'विदर्भातील शेतकऱ्यांच्या आर्थिक व इतर समस्या' या विषयावर कै. रामचंद्र भार्गव गाडगीळ स्मारक व्याख्यान मालेतील प्रकाशित व्याख्यान. १९७३, पेज न. २४
५. गंगवाल सुभाष,'भारत का विकास दशा एवं दिशा' मंगलदीप पब्लिकेशन ,२००४
६. प्रतियोगिता दर्पण, 'भारतीय अर्थव्यवस्था' एक दृष्टी में, उपकार प्रकाशन, आगरा.
७. www.mahades.gov.in
८. दैनिक वर्तमान पत्रे : पुण्यनगरी, लोकसत्ता